केवळ कार्यालयीन उपयोगाकरिता

# महाराष्ट्र शासन

# शुभमंगल सामुहिक विवाह योजना

## मूल्यमापन अहवाल

अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई

# प्रास्ताविक

अमरावती, अकोला, बुलढाणा, यवतमाळ, वाशिम व वर्धा या सहा जिल्ह्यातील “शेतकरी कुटुंबातील मुलींच्या सामुहिक विवाहासाठी अनुदान” ही राज्य पुरस्कृत योजना सन २००६ मध्ये सुरु करण्यात आली. सदर योजना अधिक्रमित करुन राज्यातील सर्व जिल्ह्यांमधील शेतकरी / शेतमजूर कुटुंबातील मुलींच्या विवाहासाठी “शुभमंगल सामुहिक विवाह योजना” या नावाने सुधारित योजना सन २००८ पासून लागू करण्यात आली आहे. शेतकरी / शेतमजूर यांच्या मुलींचे विवाह सामुहिकरित्या करण्यासाठी निधीची तरतूद उपलब्ध करुन त्याद्वारे शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्यासाठी मदत करणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे.

राज्य शासनाच्या सूचनेवरून अर्थ व सांख्यिकी संचालनालयाकडून या योजनेचा मूल्यमापन अभ्यास घेण्यात आला. उपरोक्त योजनेचे कार्यान्वयन योग्य प्रकारे सुरु आहे का? त्यात काही त्रुटी आहेत का? शेतकरी / शेतमजूर यांना या योजनेचा कितपत लाभ झाला? तसेच योजनेचा उद्देश कितपत साध्य झाला? ही या मूल्यमापन अभ्यासाची उद्दिष्टे होती. हा अहवाल पाहणी अंतर्गत गोळा करण्यात आलेल्या माहितीवर आधारित आहे.

महाराष्ट्र शासनाच्या अर्थ व सांख्यिकी संचालनालयामार्फत हा अहवाल जरी प्रकाशित करण्यात येत असला, तरी त्यात व्यक्त केलेल्या मतांशी शासन सहमत असेलच असे नाही.

ठिकाण : मुंबई
दिनांक : २१/०३/२०१४

(शै.मु.अपराजित)
अर्थ व सांख्यिकी संचालक,
मुंबई

# अनुक्रमणिका


| प्रकरण क्रमांक | प्रकरणाचे नांव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | सारांश | ३ |
| २ | शिफारसी | ७ |
| ३ | प्रस्तावना | १० |
| ४ | जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांच्याविषयी माहिती | १५ |
| ५ | स्वयंसेवी संस्थांविषयी माहिती | १९ |
| ६ | योजनंशी संबंधित लाभधारकांविषयी माहिती | २२ |

# प्रकरण-१
# सारांश

**१.०** मागील काही वर्षात विदर्भात अनेक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत, या मागच्या अनेक कारणांपैकी एक प्रमुख कारण म्हणजे शेतकऱ्यांनी त्यांच्या मुलींच्या विवाहाच्यावेळी जास्त व्याज दराने घेतलेले कर्ज फेडणे अशक्य झाल्याने आर्थिक विवंचनेला कंटाळून आत्महत्या केल्याचे शासनाच्या निदर्शनास आले. शेतकरी कर्जबाजारी होऊ नयेत व अशा आत्महत्यांना आळा बसावा या दृष्टीकोनातून शासनाने अमरावती, अकोला, बुलढाणा, यवतमाळ, वाशिम व वर्धा या सहा जिल्ह्यांतील "शेतकरी कुटुंबातील मुलींच्या सामुहिक विवाहासाठी अनुदान" ही राज्य पुरस्कृत योजना सन २००६ मध्ये सुरु केली. सदर योजना अधिक्रमित करुन राज्यातील सर्व जिल्ह्यांमधील शेतकरी / शेतमजूर कुटुंबातील मुलींच्या विवाहासाठी "शुभमंगल सामुहिक विवाह योजना" या नावाने सुधारित योजना सन २००८ पासून लागू करण्यात आली आहे. शेतकरी / शेतमजूर यांच्या मुलींचे विवाह सामुहिकरित्या करण्यासाठी निधीची तरतूद उपलब्ध करुन त्याद्वारे शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्यासाठी मदत करणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे.

## १.१ मूल्यमापन अभ्यासाची उद्दिष्टे :

अ) राज्यातील शेतकरी तसेच शेतमजूर यांना योजनेचा कितपत लाभ मिळतो व त्यामुळे त्यांचे जीवनमान कितपत सुसह्य झाले, याचा शोध घेणे.

ब) लाभार्थ्यांना पुरविण्यात आलेले आर्थिक सहाय्य धनादेशाद्वारे मिळते किंवा कसे.

क) शेतकरी तसेच शेतमजूर यांनी शुभमंगल सामुहिक विवाह योजनेचा कार्यक्रम कितपत स्विकारला, याचा शोध घेणे.

ड) योजनेच्या अंमलबजावणीतील त्रुटींचा शोध घेणे.

इ) सामुहिक विवाहासाठी विहित केलेल्या कागदपत्रांची पुर्तता स्वयंसेवी संस्था, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी आणि विवाह नोंदणी निबंधक यांच्या कार्यालयांनी संयुक्तरित्या केली किंवा कसे, याचा शोध घेणे.

फ) योजना ठरवून दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार व कार्यप्रणालीप्रमाणे राबविली जाते किंवा नाही, याचा शोध घेणे.

## १.२ निवड पध्दती :

"शुभमंगल सामुहिक विवाह योजना" राज्यातील सर्व जिल्ह्यांना लागू करण्यात आली आहे. तथापि, कोकण विभागातील मुंबई शहर, मुंबई उपनगर, रायगड व सिंधुदुर्ग या चार जिल्ह्यांमध्ये सदर योजना राबविली गेली नसल्याने मूल्यमापन अभ्यासाकरिता एकूण ३१ जिल्ह्यांची निवड करण्यात आली. निवड केलेल्या प्रत्येक जिल्ह्यातून दोन तालुके याप्रमाणे एकूण ६२ तालुक्यांची निवड करण्यात आली व निवडलेल्या ६२ तालुक्यांमधून ५४७ लाभधारकांची व ५२ स्वयंसेवी संस्थांची मूल्यमापन अभ्यासाकरिता निवड करण्यात आली.

## १.३ योजनेचे निष्कर्ष :

- **लाभधारकाचा महाराष्ट्र राज्यातील अधिवास :**
  - १५ वर्षापेक्षा जास्त — ९८ टक्के
  - १५ वर्षापेक्षा कमी — २ टक्के

- **लाभधारकांची शैक्षणिक स्थिती :-**
  - निरक्षर — २९ टक्के
  - १ ली ते ४थी पर्यन्त शिक्षण घेतलेले — ३४ टक्के
  - ५वी ते १०वी पर्यन्त शिक्षण घेतलेले — २९ टक्के
  - १० वी पेक्षा जास्त शिक्षण घेतलेले — ८ टक्के

- **लाभधारकांचे व्यवसायानुसार वर्गीकरण :-**
  - स्वत:ची शेती असणारे — ३८ टक्के
  - मजुरी करणारे — ४५ टक्के
  - इतर — १७ टक्के

- **लाभधारकांचे सामाजिक प्रवर्गनिहाय वर्गीकरण :-**
  - अनु.जाती — १९ टक्के
  - अ.ज. — १८ टक्के
  - वि.ज.भ.ज./वि.मा.प्र — १५ टक्के
  - इ.मा.व — २५ टक्के
  - इतर — २३ टक्के

- **लाभधारकांचे वार्षिक उत्पन्नानुसार वर्गीकरण :-**
  - ₹ २४,००० पेक्षा कमी — ६३ टक्के
  - ₹ २४,००० ते ५०,००० — ३१ टक्के
  - ₹ ५०,००० पेक्षा जास्त — ६ टक्के

- **स्वयंसेवी संस्थांकडे मुलींची नाव नोंदणी :-**
  - नाव नोंदणी केलेले लाभार्थी — ९५ टक्के
  - नाव नोंदणी न केलेले लाभार्थी — ५ टक्के

- **लाभ दिल्यानंतर जोडप्यांच्या सहजीवनाविषयी जिल्हा महिला व बालविकास कार्यालयांची निरिक्षणे :-**
  - निरीक्षणे न घेतलेली कार्यालये — ७१ टक्के
  - निरीक्षणे घेतलेली कार्यालये — २९ टक्के

- **लाभधारकांना योजनेची ज्या माध्यमांद्वारे माहिती प्राप्त झाली त्याचे वर्गीकरण:-**
  - स्वयंसेवी संस्थाद्वारे — ६५ टक्के
  - जाहिरातीद्वारे — १३ टक्के
  - वर्तमानपत्राद्वारे — ८ टक्के
  - इतर — १४ टक्के

- **लाभधारकांनी मुलींचे विवाह सामुहिक विवाहामध्ये केलेल्या कारणांचे वर्गीकरण :-**
    - आर्थिक स्थिती चांगली नसल्याने ५४ टक्के
    - स्वयंनिर्णय १४ टक्के
    - योजनेच्या लाभासाठी १२ टक्के
    - सामाजिक सुधारणेसाठी ८ टक्के
    - पैशाच्या बचतीसाठी १२ टक्के
- **सामुहिक विवाह संपन्न झालेल्या ठिकाणाचा स्तर :-**
    - खेडेगावात ६० टक्के
    - तालुका स्तरावर २४ टक्के
    - जिल्हास्तरावर १६ टक्के
- **लाभार्थ्यांना योजनेअंतर्गत मिळालेले अनुदान :-**
    - ₹ १०,००० पर्यत ९८ टक्के
    - ₹ १०,००० पेक्षा कमी १ टक्के
    - काहीही न मिळाले १ टक्के
- **विवाहानंतर लाभार्थ्यांना आर्थिक सहाय्य मिळण्यासाठी लागलेला कालावधी :-**
    - एक महिना १० टक्के
    - दोन महिने ९ टक्के
    - तीन महिने १० टक्के
    - सहा महिने २२ टक्के
    - सहा महिन्यापेक्षा जास्त ४८ टक्के
    - लाभ न मिळालेले १ टक्के
- **लाभार्थ्यांना आर्थिक सहाय्य प्राप्त झाल्याचे माध्यम :-**
    - धनादेशाद्वारे ९८ टक्के
    - रोखीने २ टक्के
- **लाभार्थ्यांकडून अर्थसहाय्याचा वापर :-**
    - दागिन्यांसाठी ११ टक्के
    - भांडयासाठी ३४ टक्के
    - इतर कामांसाठी ५५ टक्के
- **महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याचा दाखला सादर :-**
    - दाखला सादर केलेले लाभार्थी ८४ टक्के
    - दाखला सादर न केलेले लाभार्थी १६ टक्के
- **शेतकरी असल्याचा दाखला सादर :-**
    - ७/१२ चा उतारा सादर केलेले लाभार्थी ८४ टक्के
    - ७/१२ चा उतारा सादर न केलेले लाभार्थी १६ टक्के

- **शासन अनुदानाव्यतिरिक्त विवाहाचा अधिकचा खर्च भागविण्यासाठी लाभधारकांनी केलेली तरतूद :-**
    - स्वत:च्या उत्पन्नातुन ६६ टक्के
    - नातेवाईकांकडून २४ टक्के
    - सावकारांकडून १० टक्के

- **लाभार्थ्यांच्या मुलींना विवाह नोंदणी प्रमाणपत्र :-**
    - विवाह नोंदणी प्रमाणपत्र मिळालेले ७२ टक्के
    - विवाह नोंदणी प्रमाणपत्र मिळालेले २८ टक्के

- **शासन अनुदानाव्यतिरिक्त विवाहासाठी लाभार्थ्यांनी स्वत:च्या तरतूदीतून केलेला खर्च :-**
    - ₹ २५,००० पेक्षा कमी ६७ टक्के
    - ₹ २५,००० ते ५०,००० पर्यंत २५ टक्के
    - ₹ ५०,००० ते १,००,००० पर्यंत ६ टक्के
    - ₹ १,००,००० पेक्षा जास्त २ टक्के
- **लाभधारकांमधील हुंड्याचे प्रमाण :-**
    - हुंडा न देणारे ८४ टक्के
    - हुंडा देणाऱ्यांपैकी,
        - ₹ १०,००० पेक्षा कमी देणारे २२ टक्के
        - ₹ १०,००० ते २०,००० हुंडा देणारे ३७ टक्के
        - ₹ २०,००० ते ५०,००० हुंडा देणारे ३० टक्के
        - ₹ ५०,००० व त्यापेक्षा अधिक ११ टक्के

- शुभमंगल सामुहिक विवाह योजनेअंतर्गत ८३ टक्के लाभार्थ्यांनी योजना “अत्यंत उपयुक्त” आहे असे सांगितले.

*******

# प्रकरण-२
# शिफारसी

## योजनेबाबत शिफारसी

- "शुभमंगल सामुहिक विवाह" या योजनेअंतर्गत करण्यात येणारे सामुहिक विवाह हे शक्यतो तालुका पातळीवर आयोजित करण्याचे निर्देश असतांनादेखील ६० टक्के सामुहिक विवाह प्रामुख्याने गाव पातळीवर संपन्न झाल्याचे आकडेवारीवरुन दिसून आले असल्याने **स्थानिक पातळीवर जे ठिकाण सोयीचे असेल अशा ठिकाणी सामुहिक विवाह आयोजित करण्याच्या अनुषंगाने शासन निर्णय सुधारित करण्यात यावा.**

- "शुभमंगल सामुहिक विवाह" या योजनेशी संबंधित स्वयंसेवी संस्थांनी विस्तृत प्रसिद्धी द्यावी असे निर्देश आहेत. तथापि, प्राप्त आकडेवारीवरुन ५९ टक्के स्वयंसेवी संस्थांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे योजनेचा प्रचार व प्रसार केल्याचे दिसून येते, तर ६५ टक्के लाभधारकांनी योजनेबाबतची माहिती स्वयंसेवी संस्थांकडून मिळाल्याचे सांगितले. सदर आकडेवारीवरून स्वयंसेवी संस्थांकडून योजनेचा प्रचार व प्रसार विस्तृत प्रमाणात झाला नसल्याचे दिसून येते. **लाभार्थी निवडीतील स्वयंसेवी संस्थांचा अभिग्रह टाळण्याकरिता जिल्हा महिला व बालविकास कार्यालयानेच योजनेच्या प्रचार व प्रसारासाठी स्थानिक स्तरावरील प्रिंट व इलेक्ट्रॉनिक माध्यमांचा मोठ्या प्रमाणावर वापर करुन विस्तृत प्रसिद्धी देणे गरजेचे आहे.**

- शेतकरी / शेतमजूर यांच्याकडून इच्छुकता मागवून विवाहाबाबतची आवश्यक अशी नोंदणी स्वयंसेवी संस्थांनी करावी असे निर्देश आहेत. **तथापि, शेतकरी / शेतमजूर यांच्याकडून इच्छुकता मागविण्याबाबतचे कोणतेही प्रपत्र विहित केलेले नाही.** परिशिष्ट-अ मध्ये वधू / वर यांचा तपशिल, विवाहविषयक माहिती, बालविवाह प्रतिबंधक कायदा आणि हुंडाविरोधी कायद्याचा भंग न केल्याबाबतच्या प्रतिज्ञापत्रावर वधू व वर यांची स्वाक्षरी घेण्यासाठी तरतूद केली आहे. तथापि, योजनेच्या संपूर्ण प्रक्रियेमध्ये लाभधारक शेतकरी / शेतमजूर यांच्या स्वाक्षरीची कोठेही तरतूद नसतांनादेखील ₹ १०,०००/- चे अनुदान वधूच्या वडिलांना व हयात नसल्यास आईच्या नावाने धनादेशाद्वारे देण्यात येते. यामध्ये लाभधारक शेतकरी / शेतमजूर यांच्या स्वाक्षरीची तरतूद नसल्याने प्रत्यक्षात ज्या जोडप्याचा सामुहिक सोहळ्यामध्ये विवाह संपन्न झाला आहे, त्या जोडप्यातील वधूच्या वडिलांनाच धनादेश मिळेल याची खात्री देता येत नाही. **त्यामुळे सदर विसंगतीचे निरसन करण्यासाठी शेतकरी / शेतमजूर यांची इच्छुकता मागविण्यासाठी प्रपत्र विहित करण्यात यावे, तसेच वधू / वर यांचेसाठी विहित केलेल्या परिशिष्ट अ विवाहविषयक माहिती, बालविवाह प्रतिबंधक कायदा आणि हुंडाविरोधी कायद्याचा भंग न केल्याबाबतच्या प्रतिज्ञापत्रावर वधू / वर यांसह वधु / वर पित्याच्या स्वाक्षरीचीदेखील तरतूद करणे आवश्यक आहे.**

- शेतकरी / शेतमजूर यांच्याकडून इच्छुकता मागवून विवाहाबाबतची आवश्यक अशी नोंदणी स्वयंसेवी संस्थांनी करावी असे निर्देश आहेत. तथापि, प्राप्त आकडेवारीवरुन नोंदणी न करतादेखील विवाह संपन्न झाल्याचे दिसून येते. त्यामुळे विवाह संपन्न न होता शासनाकडून अनुदान मिळविण्याचे प्रकार घडण्यास वाव आहे. **सदरची तफावत दूर करण्याकरिता नोंदणी झालेल्या लाभधारकांच्या पाल्यांचेच विवाह सामुहिक सोहळयात आयोजित करणे अनिवार्य करण्यात यावे.**

- वधू व वर हे महाराष्ट्र राज्याचे अधिवासी असणे अनिवार्य आहे. तथापि, प्राप्त आकडेवारीवरुन महाराष्ट्र राज्याचे अधिवासी नसताना, तसेच लाभधारकांकडे शेतकरी / शेतमजूर असल्याबाबतचा दाखला नसतांनादेखील पाल्याचा विवाह संपन्न झाल्याचे दिसून आले. त्यामुळे अटी व शर्ती याची पूर्तता नोंदणीच्या वेळीच पूर्ण करणे आवश्यक आहे. **जे शेतकरी / शेतमजूर मुलीचा विवाह सामुहिक विवाह सोहळयात करण्याबाबत स्वयंसेवी संस्थेकडे नोंद करतात त्या वेळीच सर्व कागदपत्रांची पूर्तता झाल्याची खात्री करावी व जे शेतकरी / शेतमजूर कागदपत्रांची पूर्तता करतील अशाच शेतकरी / शेतमजूर यांच्या मुलींचे विवाह सामुहिक विवाह सोहळयात करण्यासाठी मान्यता देण्यासंदर्भात शासन निर्णयात सुधारणा करण्यात यावी.**

- या योजनेशी संबंधित दिनांक ७ मे, २००८ च्या शासन निर्णयाच्या परिच्छेद क्र. १ व परिच्छेद ४ (३) मधील आाशय विचारात घेता त्यामध्ये विसंगती दिसून येते. परिच्छेद ४ (३) मध्ये वराचा उल्लेख अनावश्यक असून त्यामुळे संभ्रम निर्माण होतो आहे. तसेच सदर योजनेंतर्गत अनुदान हे वधूच्याच वडिलांस अनुज्ञेय असल्याने परिच्छेद ४ (३) मध्ये "अनुदान पुनर्विवाहाकरिता अनुज्ञेय राहणार नाही. तथापि, वधू विधवा किंवा घटस्फोटीत असल्यास तिच्या पुनर्विवाहासाठी अनुदान अनुज्ञेय राहील." हे विधान परस्पर विरोधी आहे. **त्यामुळे सदरची अट स्वयंस्पष्ट असणे गरजेचे असल्याने शासननिर्णयात आवश्यक सुधारणा करण्यात यावी.**

- सदर योजना राबविणाऱ्या यंत्रणेकरिता देण्यात येणारे अनुदान अत्यल्प असून त्यामध्ये वाढत्या महागाईनुसार वाढ करणे आवश्यक आहे.**तसेच लाभार्थ्यांना देण्यात येणा-या अनुदानात सुध्दा तशाच प्रकारे वाढ करणे आवश्यक आहे.**

- **सामुहिक विवाह सोहळयातच निबंधक विवाह नोंदणी यांचे प्रमाणपत्र उपलब्ध करुन देणे अनिवार्य करण्यात यावे.**

- **शासनाकडून देण्यात येणारे अनुदान हे विवाहाच्या दिवशीच विवाह नोंदणी प्रमाणपत्रासोबत देणे अनिवार्य करण्यात यावे.**

- हुंडा प्रतिबंधक कायद्याचा भंग होऊ नये अशी अट असतांनादेखील हुंड्याची देवाण-घेवाण झाल्याचे निदर्शनास आले. **त्यामुळे वधू व वराच्या पालकांची बालविवाह प्रतिबंधक कायदा आणि हुंडा प्रतिबंधक कायदा भंग न केल्याबाबतच्या प्रतिज्ञापत्रावर स्वाक्षरी अनिवार्य करण्यात यावी.**

- "शुभमंगल सामुहिक विवाह" या योजनेंतर्गत ज्या जोडप्यांचे विवाह संपन्न झाले त्यांच्या सहजीवनाविषयी (उदा. आर्थिक/ सामाजिक) **बहुतांश जिल्हा महिला व बालविकास अधिकाऱ्यांकडून निरिक्षणे घेण्यात येत नसल्याने अशी निरीक्षणे घेणे अनिवार्य करण्यात यावे.**

- "शुभमंगल सामुहिक विवाह" या योजनेंतर्गत या योजनेसंबंधी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयामधील काही संकल्पना संदिग्ध आहेत. शासन निर्णय स्वयंस्पष्ट असणे आवश्यक आहे. **त्यामुळे शासन निर्णयातील संदिग्धतेचे निरसन करुन स्वयंस्पष्ट शासन निर्णय निर्गमित करण्यात यावा.**

- या योजनेचा अभ्यास केला असता शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण कमी झाले असल्याचे दिसून आल्याने ही योजना “उपयुक्त” आहे. तथापि, **सदरची योजना “अधिक उपयुक्त” होण्याकरिता वर नमूद केलेल्या शिफारशींवर कार्यवाही होणे गरजेचे आहे.**

*******

# प्रकरण-३
# प्रस्तावना

## योजनेची पार्श्वभूमी

**३.१** मागील काही वर्षात विदर्भातील अनेक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत, या मागच्या अनेक कारणांपैकी एक प्रमुख कारण म्हणजे शेतकऱ्यांनी त्यांच्या मुलींच्या विवाहाच्यावेळी जास्त व्याज दराने घेतलेले कर्ज फेडणे अशक्य झाल्याने आर्थिक विवंचनेला कंटाळून आत्महत्या केल्याचे शासनाच्या निदर्शनास आले. शेतकरी कर्जबाजारी होऊ नयेत व अशा आत्महत्यांना आळा बसावा या दृष्टीकोनातून शासनाने "अमरावती विभागातील सर्व जिल्हे व नागपूर विभागातील वर्धा या सहा जिल्ह्यांतील “शेतकरी कुटुंबातील मुलींच्या सामुहिक विवाहासाठी अनुदान” ही राज्य पुरस्कृत योजना १५ फेब्रुवारी, २००६ च्या शासन निर्णयाद्वारे कार्यान्वित केली. सदर योजना ७ मे, २००८ च्या शासन निर्णयाद्वारे अधिक्रमित करण्यात आली असून सध्या राज्यातील सर्व जिल्ह्यातील शेतकरी / शेतमजूर यांच्या कुटुंबातील मुलींच्या सामुहिक विवाहाकरिता "**शुभमंगल सामुहिक विवाह योजना**" या नावाने योजना लागू करण्यात आली आहे.

## योजनेचा उद्देश

**३.२** महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्हयांतील शेतकरी / शेतमजूर यांच्या मुलींच्या सामुहिक विवाहाकरिता "शुभमंगल सामुहिक विवाह योजना" राज्यात राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत शेतकरी / शेतमजूर कुटुंबातील मुलींच्या विवाहासाठी आवश्यक असलेल्या मंगळसूत्र व इतर अनुषंगिक वस्तूंची खरेदी करण्यासाठी शासनातर्फे अनुदान देण्यात येते.

## योजनेची व्याप्ती आणि प्रगती

**३.३** विदर्भातील शेतकऱ्यांनी त्यांच्या मुलींच्या लग्नाकरिता जास्त व्याज दराने घेतलेल्या कर्जाला कंटाळून आत्महत्या केल्याचे शासनाच्या निदर्शनास आले. त्यामुळे शासनाने शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्यासाठी मुलींच्या सामुहिक विवाहासाठी एक पॅकेज जाहिर केले होते. सन-२००५-०६ सालामध्ये ३५ जिल्हयांपैकी विदर्भातील ६ जिल्हयांमध्ये सदर योजना राबविण्यात आली होती. सन २००८ पासून राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये ही योजना राबविण्यात येत आहे. वर्ष २००५-०६ पासून वर्ष २०१०-११ पर्यंत राज्यात या योजनेअंतर्गत प्राप्त निधी, झालेला खर्च व संपन्न झालेल्या विवाहाची संख्या खालील तक्ता क्र. ३.१ मध्ये दर्शविण्यात आली आहे.

**तक्ता क्र. ३.१**
**शुभमंगल सामुहिक विवाह या योजनेअंतर्गत वर्षनिहाय प्राप्त निधी, प्रत्यक्ष खर्च व विवाहांची संख्या**

( ₹ हजारात)

| वर्ष | प्राप्त निधी | प्रत्यक्ष खर्च | विवाह संख्या |
|---|---|---|---|
| २००५-२००६ | १९,९९८ | १९,९९८ | १,८१८ |
| २००६-२००७ | १,२७,७९१ | १,०८,४०९ | ९,८५५ |
| २००७-२००८ | ९१,४०० | ६३,७८६ | ५,८०६ |
| २००८-२००९ | १,२०,००० | १,१५,४७७ | ९,९५९ |
| २००९-२०१० | १,२६,२२८ | १,२६,२२७ | १०,५२८ |
| २०१०-२०११ | १,०६,८०० | १,०६,७८८ | ८,८९९ |
| **एकूण** | ५,९२,२१७ | ५,४०,६८५ | ४६,८६५ |

## योजनेची अंमलबजावणी यंत्रणा व कार्यपध्दती

**३.४** “शुभमंगल सामुहिक विवाह योजना” या योजनेसाठी आयुक्त, महिला व बालविकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित केले आहे. या योजनेची अंमलबजावणी संबंधित स्वयंसेवी संस्था, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी तसेच विवाह नोंदणी अधिकारी यांच्यामार्फत संयुक्तरित्या पार पाडली जाते. या योजनेअंतर्गत विवाह सोहळे शक्यतो तालुका पातळीवर आयोजित करावेत असे निर्देश आहेत. ही योजना राबविण्यासाठी येणारा खर्च सामाजिक सुरक्षा व कल्याण या मुख्य लेखा शिर्षाखाली मंजूर करुन जिल्हा महिला व बालविकास अधिकारी संबंधित लाभार्थ्यास व स्वयंसेवी संस्थांना अनुदान अदा करतात. या सामुहिक विवाह सोहळयास अनुदान मिळण्यासाठी कोणताही आर्थिक अथवा जातीचा निकष लावला जात नाही.

**३.४.१** “शुभमंगल सामुहिक विवाह योजना” ही योजना राबविण्यासाठी प्रथमत: संबंधित जिल्ह्यातील स्वयंसेवी संस्था या योजनेचा व्यापक प्रचार/प्रसार करतात. शेतकरी / शेतमजूर यांच्याकडून मुलींच्या विवाहाबाबतची इच्छुकता मागवून स्वयंसेवी संस्थेमार्फत त्यांची नोंदणी करण्यात येते. त्यानंतर तालुका पातळीवर लोकप्रतिनिधीच्या सल्ल्याने उपयुक्त जागी व शुभमुहूर्त पाहून सामुहिक विवाह सोहळा आयोजित करण्यात येतो. या योजनेअंतर्गत आर्थिक सहाय्य मिळण्यासाठी जोडप्यांकडून व संबंधित स्वयंसेवी संस्थांकडून जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचेकडे माहिती सादर करण्यात येते.

## योजनेचे स्वरूप

**३.५** या योजनेअंतर्गत सामुहिक विवाह सोहळयांसाठी किमान ५ दांपत्यांचा समावेश असणे अनिवार्य आहे.

- ❖ या योजनेअंतर्गत शेतकरी / शेतमजूर कुटुंबातील मुलींच्या विवाहासाठी आवश्यक असलेल्या मंगळसूत्र व इतर वस्तुंची खरेदी करण्यासाठी प्रति जोडपे ₹ १०,०००/- एवढे अनुदान शासनातर्फे देण्यात येते.

- ❖ ही योजना नोंदणीकृत स्वयंसेवी संस्था राबवित असल्यामुळे विवाहाचे आयोजन, विवाह नोंदणी खर्च व विवाह समारंभाचा इतर अनुषंगिक खर्च भागविण्यासाठी स्वयंसेवी संस्थांना प्रति जोडपे ₹ २,०००/- एवढे अनुदान शासनातर्फे देण्यात येते.

## लाभधारकांच्या पात्रतेच्या अटी व शर्ती

**३.६** शुभमंगल सामुहिक विवाह या योजनेसाठीच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे आहेत.

- ❖ वधू व वर हे महाराष्ट्र राज्याचे अधिवासी (Domiciled) असणे अनिवार्य.
- ❖ विवाह सोहळयाचे दिनांकास वराचे वय २१ वर्षे तर वधूचे वय १८ वर्षे यापेक्षा कमी असू नये. यासाठी जन्मनोंदणी प्रमाणपत्र किंवा शाळा सोडल्याचा दाखला किंवा शालांत परिक्षा प्रमाणपत्र किंवा स्थानिक प्राधिकाऱ्याने दिलेला जन्माचा दाखला किंवा वैद्यकीय अधिकाऱ्याचे वयाबाबतचे प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येते.
- ❖ वधू-वरांना त्यांच्या प्रथम विवाहासाठीच हे अनुदान अनुज्ञेय असेल. सदरचे अनुदान पुनर्विवाहाकरिता अनुज्ञेय राहणार नाही. तथापि वधू, विधवा किंवा घटस्फोटीत असल्यास तिच्या पुनर्विवाहासाठी अनुदान अनुज्ञेय राहील.
- ❖ बालविवाह प्रतिबंध कायदा व हुंडा प्रतिबंधक कायद्यांतर्गत असलेल्या कोणत्याही कलमाचा भंग या दांपत्याकडून झाला नसावा.
- ❖ विवाह झाल्यानंतर विवाह नोंदणी प्रमाणपत्र मिळवून देण्याची जबाबदारी स्वयंसेवी संस्थेची राहील व त्यासाठी लागणारे नोंदणी शुल्क स्वयंसेवी संस्थांनी त्यांना मिळणाऱ्या अनुदानातून अदा करावे.
- ❖ लाभार्थी हा शेतकरी असल्याचा पुरावा म्हणून जमिनीच्या ७/१२ चा उतारा व त्या गावचे रहिवासी असल्याबाबत ग्रामसेवक / तलाठी यांचा दाखला सादर करणे आवश्यक राहील. तसेच लाभार्थी शेतमजूर असल्यास संबंधित लाभार्थी शेतमजूर असल्याबाबतचा ग्रामसेवक / तलाठी यांचा दाखला अनिवार्य राहील.

## ३.७ मूल्यमापन अभ्यासाची उद्दिष्टे

- ❖ राज्यातील शेतक-यांना तसेच शेतमजूरांना योजनेचा कितपत लाभ मिळतो व त्यामुळे त्यांचे जीवनमान कितपत सुसहय झाले याचा शोध घेणे.
- ❖ लाभार्थ्यांना पुरविण्यात आलेले आर्थिक सहाय्य धनादेशाद्वारे मिळते किंवा कसे. शेतकऱ्यांनी तसेच शेतमजूरांनी शुभमंगल सामुहिक विवाह योजनेचा कार्यक्रम कितपत स्विकारला याचा शोध घेणे.
- ❖ योजनेच्या अंमलबजावणीतील त्रुटींचा शोध घेणे.
- ❖ विवाहासाठी विहित केलेल्या कागदपत्रांची पुर्तता स्वयंसेवी संस्था, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी आणि विवाह नोंदणी निबंधक यांच्या कार्यालयांनी संयुक्तरित्या केली किंवा कसे याचा शोध घेणे.
- ❖ योजना ठरवून दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार व कार्यप्रणालीप्रमाणे राबविली जाते किंवा नाही याचा शोध घेणे.

## मूल्यमापन अभ्यासाची व्याप्ती व नमुनानिवड पध्दती :

**३.८ या मूल्यमापन अभ्यासासाठी विविध स्तरावर अवलंबिण्यात आलेली नमुना निवड पद्धती खालीलप्रमाणे आहे.**

- **जिल्ह्याची निवड** : सदर योजना राज्यातील सर्व ३५ जिल्ह्यांमध्ये राबविण्याचे निर्देश आहेत. तथापि, कोकण विभागातील मुंबई शहर, मुंबई उपनगर, रायगड व सिंधुदुर्ग या चार जिल्हयांमध्ये सदर योजना राबविली गेली नसल्याने या अभ्यासासाठी एकूण ३१ जिल्हयांची निवड करण्यात आली.
- **तालुक्याची निवड** : निवडलेल्या ३१ जिल्ह्यातून जास्तीत जास्त लाभार्थी असलेले प्रत्येकी दोन तालुके याप्रमाणे ६२ तालुक्यांची निवड करण्यात आली.
- **लाभधारकाची निवड** : निवडलेल्या प्रत्येक तालुक्यातून यादृच्छिक पध्दतीने प्रत्येकी १० लाभधारक याप्रमाणे ६२० लाभार्थ्यांची निवड करावयाची होती. तथापि, काही तालुक्यात पुरेसे लाभधारक उपलब्ध नसल्याने या अभ्यासासाठी ५४७ लाभधारकांची निवड झाली.
- **नोंदणीकृत स्वयंसेवी संस्थांची निवड** : या योजनेंतर्गत निवडलेल्या तालुक्यातून ज्या स्वयंसेवी संस्थेने सर्वात जास्त संख्येने विवाह आयोजित केलेले होते अशा ५२ स्वयंसेवी संस्थांची निवड करण्यात आली.

### तक्ता क्र. ३.२
**निवडण्यात आलेले जिल्हे, तालुके व लाभधारक यांची संख्या**

| अ. क्र. | विभाग | निवडलेले जिल्हे (मुंबई शहर, मुंबई उपनगर रायगड व सिंधुदुर्ग वगळून) | निवडलेले तालुके | उपलब्ध झालेल्या लाभार्थ्यांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १. | कोकण | ठाणे,रत्नागिरी | ४ | २९ |
| २. | नाशिक | नाशिक,धुळे,जळगांव,अहमदनगर,नंदूरबार | १० | ८७ |
| ३. | पुणे | पुणे, सातारा, सांगली, सोलापूर,कोल्हापूर | १० | ९० |
| ४. | औरंगाबाद | औरंगाबाद,जालना,परभणी,बीड,नांदेड, उस्मानाबाद,लातूर,हिंगोली | १६ | १२१ |
| ५. | अमरावती | अमरावती,बुलढाणा, अकोला,यवतमाळ,वाशिम | १० | १०० |
| ६. | नागपूर | नागपूर,वर्धा,भंडारा,चंद्रपूर,गडचिरोली,गोंदीया | १२ | १२० |
| | एकूण | ३१ | ६२ | ५४७ |

## क्षेत्रकाम

**३.९ मूल्यमापन अभ्यासासाठी पत्रके :**

शुभमंगल सामुहिक विवाह योजना या विषयाच्या मूल्यमापन अभ्यासासाठी खाली नमूद एकूण तीन पत्रके तयार करण्यात आलेली होती.

- **पत्रक-१** : जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांचेकडून भरावयाचे पत्रक
- **पत्रक-२** : स्वयंसेवी संस्था यांचेकडून भरावयाचे पत्रक
- **पत्रक-३** : निवडलेल्या लाभधारकाकडून घ्यावयाच्या माहितीचे पत्रक

**३.१०** सदर योजनेचे क्षेत्रकाम जुलै ते ऑगस्ट २०११ या कालावधीत करण्यात आले.

*******

# प्रकरण-४

# जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांच्याविषयी माहिती

## योजनेची व्याप्ती व प्रगती

**४.१** “शुभमंगल सामुहिक विवाह योजना” ही योजना राज्यातील सर्व जिल्हयांमध्ये (कोकण विभागातील मुंबई शहर, मुंबई उपनगर, रायगड व सिंधुदुर्ग हे चार जिल्हे वगळून) राबविण्यात येत असून या योजनेसाठी आयुक्त, महिला व बालविकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे हे 'नियंत्रक अधिकारी' म्हणून काम पाहतात. या योजनेच्या मूल्यमापन अभ्यासासाठी ३१ जिल्हे निवडण्यात आले असून प्रत्येक जिल्ह्यातून जास्तीतजास्त लाभार्थी असलेल्या दोन तालुक्यांची निवड करण्यात आली आहे. निवडलेल्या तालुक्यातून प्रत्येकी १० लाभधारक शेतकरी / शेतमजूर यांची निवड या मूल्यमापन अभ्यासासाठी करण्यात आली आहे. या योजनेसाठी शासनाकडून विभागनिहाय उपलब्ध केलेला निधी व विवाहासाठी लाभार्थी व स्वयंसेवी संस्था यांना वितरीत आर्थिक सहाय्य याबाबतची माहिती तक्ता क्र.४.१ मध्ये देण्यात आली आहे.

### तक्ता क्र. -४.१

### योजनेसाठी शासनाकडून विभागनिहाय प्राप्त निधी व वितरीत सहाय्य

**(₹ लाखात)**

| अ.क्र | विभाग | बाब | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्राप्त निधी | | | विवाहासाठी लाभार्थ्यांना वितरीत आर्थिक सहाय्याची रक्कम | | | विवाहासाठी संस्थांना वितरीत आर्थिक सहाय्याची रक्कम | | |
| | | २००८- ०९ | २००९-१० | २०१०-११ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ |
| १ | कोकण | ६.७२ | १३.३२ | ५.७६ | ५.६० | ११.०० | ४.८० | १.१२ | २.२० | ०.९६ |
| २ | नाशिक | २२.८० | २७.६१ | १०८.०० | १९.०० | २३.०१ | ९०.०० | ३.८० | ४.६० | १८.०० |
| ३ | पुणे | ३६.०० | ७३.९४ | ६८.१२ | ३४.२८ | ६५.१० | ५७.४८ | ५२.८४ | ५१.३४ | १९.१६ |
| ४ | औरंगाबाद | ११.४० | ३५.५२ | ३८.७६ | ७.५० | २६.९९ | ३२.५२ | १.५० | ६.४४ | ६.९० |
| ५ | अमरावती | १,०१०.९८ | ९३४.६७ | ८२५.१० | ८७५.४० | ७५९.५० | ७०२.५० | १३५.५८ | १५०.३३ | १२२.६० |
| ६ | नागपूर | ६७.५९ | १५५.८४ | १६६.१६ | ५६.३० | १२९.८७ | १३८.४० | ११.२६ | २५.१७ | २७.६८ |
| **एकूण** | | **१,१५५.४९** | **१,२४०.९०** | **१,२११.९०** | **९९८.०८** | **१,०१५.४७** | **१,०२५.७०** | **२०६.१०** | **२४०.०८** | **१९५.३०** |

**४.२** "शुभमंगल सामुहिक विवाह योजना" या योजनेसाठी शासनाने वर्ष २००८-०९ ते २०१०-११ या कालावधीमध्ये राज्याकरिता ₹ ३,६०८.२९ लाख इतका निधी उपलब्ध करुन दिला होता, त्यापैकी विवाहासाठी लाभार्थ्यांना दिलेली आर्थिक सहाय्याची रक्कम ₹ ३,०४७.४४ लाख इतकी होती, तर विवाहासाठी स्वयंसेवी संस्थांना वितरीत आर्थिक सहाय्याची रक्कम ₹ ६४७.८३ लाख इतकी होती. शासनाकडून प्राप्त निधी विचारात घेता, ₹ ८६.९८ लाख इतका अधिक खर्च झाला असल्याचे दिसून येते.

**४.३** राज्यात अमरावती विभागासाठी वर्ष २००८-०९ ते २०१०-११ या आर्थिक वर्षांमध्ये इतर विभागाच्या तुलनेत तीन चतुर्थांशपेक्षाही अधिक निधी उपलब्ध झाला होता, तर कोकण विभागासाठी सर्वात कमी

म्हणजे ०.६६ टक्के इतका निधी प्राप्त झालेला होता.विभागनिहाय प्राप्त निधी पूर्णपणे खर्ची पडल्याचे दिसून आले.

**४.४** "शुभमंगल सामुहिक विवाह योजना" या योजनेअंतर्गत विवाह मेळाव्यांची संख्या व सहभागी जोडप्यांची संख्या याबाबतची विभाग व वर्षनिहाय माहिती तक्ता क्र.४.२ मध्ये दिली आहे.

## तक्ता क्र.-४.२

## योजनेअंतर्गत सामुहिक विवाह मेळावे व विवाह मेळाव्यात सहभागी झालेली जोडपे यांची संख्या

| अ.क्र | विभाग | सामुहिक विवाहमेळाव्यांची संख्या | | | विवाह मेळाव्यात सहभागी जोडप्यांची संख्या | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ |
| १ | कोकण | १ | ३ | १ | ५६ | ११० | ४८ |
| २ | नाशिक | ४ | १९ | १० | १९० | २,०७९ | १९७० |
| ३ | पुणे | १० | ३१ | २६ | ३२३ | ६८३ | १२१३ |
| ४ | औरंगाबाद | ४ | १८ | २० | ७५ | ४६० | ४४३ |
| ५ | अमरावती | ३२२ | ४०५ | ४७९ | ८,९७१ | १०,६४२ | १९,७२७ |
| ६ | नागपूर | २६ | ५३ | ६५ | ५६३ | १,७०० | २,३३९ |
| | **एकूण** | **३६७** | **५२९** | **६०१** | **१०,१७८** | **१५,६७४** | **२५,७४०** |

**४.५** जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांच्याकडून प्राप्त माहितीनुसार "शुभमंगल सामुहिक विवाह योजनेअंतर्गत वर्ष २००८-०९ ते २०१०-११ मध्ये एकूण १,४९७ मेळावे घेण्यात आले असून त्यामध्ये एकूण जोडप्यांची संख्या ५१,५९२ इतकी होती. राज्यात आयोजित केलेल्या एकूण मेळाव्यांपैकी एकट्या अमरावती विभागामध्ये ८१ टक्के विवाह मेळावे आयोजित करण्यात आलेले होते. एकूण जोडप्यांपैकी जवळपास ७६ टक्के जोडपी अमरावती विभागातील होती.

**४.६** "शुभमंगल सामुहिक विवाह योजना" या योजनेअंतर्गत आर्थिक सहाय्य मिळण्यासाठी जोडप्यांकडून प्राप्त अर्ज, त्यापैकी मंजूर अर्ज, प्रलंबित अर्ज व नामंजूर अर्ज याबाबत जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या माहितीचा विभागनिहाय तपशिल तक्ता क्र.४.३ दिला आहे.

## तक्ता क्र.४.३
## वर्षनिहाय एकूण प्राप्त अर्ज, मंजूर अर्ज, नामंजूर केलेले अर्ज, प्रलंबित अर्जाची संख्या

| अ. क्र | विभाग | वर्षनिहाय एकूण प्राप्तअर्ज | | | मंजूर अर्ज | | | नामंजूर केलेले अर्ज | | | वर्ष अखेरीस प्रलंबित अर्ज | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) |
| १ | कोकण | ५६ | १७७ | ६६ | ५६ | ११० | ४८ | ० | ६७ | १८ | ० | ० | ० |
| २ | नाशिक | २७२ | २,१०९ | २,०३७ | १९० | २,०७९ | १९७० | ८२ | ३० | ६७ | ० | ० | १,०५८ |
| ३ | पुणे | ३२३ | ७१० | १,२१३ | ३२३ | ६८३ | १२१३ | ० | २७ | ० | २३ | ३२ | २५५ |
| ४ | औरंगाबाद | ७६ | ४६९ | ४७९ | ७५ | ४६० | ४४३ | १ | ९ | ३६ | १० | २५१ | १६१ |
| ५ | अमरावती | ८,९७१ | १०,६४२ | १९,७२७ | ८,९७१ | १०,६४२ | १९,७२७ | ० | ० | ० | २१९ | २,३०८ | ११,४८६ |
| ६ | नागपूर | ५९४ | १,७०१ | २,३७९ | ५६३ | १,७०० | २,३३९ | ३१ | १ | ० | ० | २३२ | ९५५ |
| **एकूण** | | **१०,२९२** | **१५,८०८** | **२५,९०१** | **१०,१७८** | **१५,६७४** | **२५,७४०** | **११४** | **१३४** | **१६१** | **२५२** | **२,८२३** | **१३,९१५** |

**४.७** "शुभमंगल सामुहिक विवाह योजना" या योजनेअंतर्गत वर्ष २००८-०९ ते २०१०-११ मध्ये प्रत्येक वर्षी एकूण प्राप्त अर्जांपैकी ९९ टक्के अर्ज मंजूर करण्यात आले असल्याचे दिसून येते. वर्ष २००८-०९ ते २०१०-११ मध्ये प्रत्येक वर्षी प्राप्त एकूण अर्जांपैकी १ टक्का अर्ज नामंजूर झाल्याचे दिसून येते. वर्ष २०१०-११ मध्ये प्रलंबित अर्जांचे प्रमाण सर्वाधिक म्हणजे ५४ टक्के होते.

**४.८** "शुभमंगल सामुहिक विवाह योजना" या योजनेअंतर्गत आर्थिक सहाय्य मिळत असल्यामुळे ९७ टक्के व सामाजिक बदल घडविण्याच्या दृष्टिने जोडपी सामुहिक विवाहासाठी उद्युक्त होत असल्याचे ८४ टक्के जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांनी सांगितले.

**४.९** "शुभमंगल सामुहिक विवाह योजना" या योजनेमुळे हुंडा पध्दतीला प्रतिबंध झाल्याचे ८४ टक्के जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांनी सांगितले.

**४.१०** सदर योजनेंतर्गत लाभार्थ्यांना शासनाकडून आर्थिक सहाय्य मिळाल्याने तसेच सामुहिक विवाह केल्यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण जवळजवळ ९० टक्क्यांनी कमी झाल्याचे जिल्हा महिला व बालविकास अधिकाऱ्यांकडून प्राप्त झालेल्या आकडेवारीवरुन दिसून येते.

**४.११** "शुभमंगल सामुहिक विवाह योजना" या सामुहिक विवाह योजनेत विवाहित जोडप्यांना आर्थिक सहाय्य दिल्यानंतर त्यांच्या सहजीवनाविषयी (उदा. आर्थिक / सामाजिक) निरिक्षणे घेण्यात येतात का याबाबत जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांचेकडून माहिती घेतली असता ७१ टक्के जिल्हा महिला व बालविकास अधिकाऱ्यांनी अशा प्रकारची निरिक्षणे घेतली जात नसल्याचे सांगितले.

**४.१२** "शुभमंगल सामुहिक विवाह योजना" या योजनेअंतर्गत लाभार्थी शेतकरी/शेतमजूर यांना मुलींच्या विवाहासाठी द्यावयाचे अर्थसहाय्य हे धनादेशाद्वारे दिले जाते असे १०० टक्के महिला व बाल विकास अधिकारी यांनी सांगितले.

**४.१३** सातारा जिल्हा वगळता उर्वरित सर्व जिल्ह्यांमध्ये स्वयंसेवी संस्थांना धनादेशाद्वारे अनुदान उपलब्ध करण्यात आले होते. तथापि, जिल्हा महिला व बालविकास कार्यालय, सातारा यांनी सामुहिक विवाह आयोजित करणाऱ्या स्वयंसेवी संस्थेला रोखीने अनुदान दिल्याचे प्राप्त आकडेवारीवरुन दिसून येते.

*******

# प्रकरण-५
# स्वयंसेवी संस्थांविषयी माहिती

## योजनेची अंमलबजावणी यंत्रणा व कार्यपध्दती

**५.१** शुभमंगल सामुहिक विवाह या योजनेअंतर्गत मूल्यमापन अभ्यासासाठी निवड झालेल्या स्वयंसेवी संस्थाकडून प्राप्त माहिती तक्ता क्र. ५.१ मध्ये दिली आहे.

**तक्ता क्र.- ५.१**
**स्वयंसेवी संस्थांनी आयोजित केलेले सामुहिक विवाह**

| अ.क्र | विभाग | स्वयंसेवी संस्थांनी आयोजित केलेल्या सामुहिक विवाह मेळाव्यांमध्ये सहभागी होण्यासाठी नोंदणी केलेल्या जोडप्यांची संख्या | | | स्वयंसेवी संस्थांनी आयोजित केलेल्या मेळाव्यांमध्ये प्रत्यक्ष विवाह झालेल्या जोडप्यांची संख्या | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ |
| १ | कोकण | ० | १७६ | ६६ | ० | ११० | ४८ |
| २ | नाशिक | १,८४९ | १४३ | ६८ | १,८४५ | १४० | ६३ |
| ३ | पुणे | ३६७ | ४५६ | ३४८ | ३६६ | ४५६ | ३४८ |
| ४ | औरंगाबाद | ३५ | ४१० | १२० | ३५ | ३८७ | १२० |
| ५ | अमरावती | ३५७ | १,०२६ | १,१०२ | ३५२ | ९०१ | १,०५६ |
| ६ | नागपूर | २८७ | ५५९ | ४४६ | २७१ | ५३६ | ४२३ |
| **एकूण** | | २,८९५ | २,७७० | २,१५० | २,८६९ | २५३० | २,०५८ |

**५.२** शुभमंगल सामुहिक विवाह या योजनेअंतर्गत वर्ष २००८-०९ ते २०१०-११ या कालावधीत स्वयंसेवी संस्थांकडे सामुहिक विवाह मेळाव्यांमध्ये सहभागी होण्यासाठी विभागवार नोंदणी झालेल्या जोडप्यांच्या आकडेवारीवरुन सर्वाधिक जोडप्यांची नोंदणी (३२ टक्के) अमरावती विभागामध्ये तर सर्वात कमी म्हणजे ३ टक्के कोकण विभागामध्ये झाल्याचे दिसून आले. सामुहिक विवाहासाठी नोंदणी झालेल्या जोडप्यांपैकी कोकण विभाग वगळता उर्वरित सर्व विभागांमध्ये ९२ टक्क्यांपेक्षा अधिक जोडप्यांनी विवाह मेळाव्यांमध्ये प्रत्यक्ष विवाह केले होते, तर कोकण विभागातील फक्त ६५ टक्के जोडप्यांनी विवाह मेळाव्यांमध्ये विवाह केले होते.

**५.४** या मूल्यमापन अभ्यासासाठी निवड झालेल्या स्वयंसेवी संस्थांना शुभमंगल सामुहिक विवाह या योजनेअंतर्गत शासनाकडून प्राप्त अनुदानाबाबतची माहीती तक्ता क्र. ५.२ मध्ये दिली आहे.

## तक्ता क्र.- ५.२
## प्राप्त अनुदानाची माहिती

| अ.क्र | विभाग | शासनाकडून प्राप्त अनुदान (₹ लाखात) | | | | प्राप्त अनुदानाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | २००८-०९- | २००९-१० | २०१०-११ | एकूण | |
| १ | कोकण | ०.०० | २.२० | ०.९६ | ३.१६ | २.२७ |
| २ | नाशिक | ३.०६ | १०.५२ | १९.६४ | ३३.२२ | २३.८८ |
| ३ | पुणे | २.६८ | ७.६२ | ६.४८ | १६.७८ | १२.०६ |
| ४ | औरंगाबाद | ०.६८ | १०.१६ | २.२० | १३.०४ | ९.३७ |
| ५ | अमरावती | ५.३९ | १६.७४ | ९.८८ | ३२.०१ | २३.०० |
| ६ | नागपूर | ६.६८ | २२.८० | ११.४६ | ४०.९४ | २९.४२ |
| **एकूण** | | **१८.४९** | **७०.०४** | **५०.६२** | **१३९.१५** | **१००.००** |

**५.५** वरील तक्त्यावरुन दिसून येते की, वर्ष २००८-०९, २००९-१० व २०१०-११ या कालावधीत निवड झालेल्या स्वयंसेवी संस्थांना प्राप्त झालेल्या एकूण रु.१३९.१५ लाख निधीपैकी सर्वात जास्त निधी नागपूर विभागाला (२९ टक्के) प्राप्त झाला. त्याखालोखाल नाशिक विभागाला २४ टक्के इतका निधी प्राप्त झाल्याचे दिसून आले.

**५.६** शुभमंगल सामुहिक विवाह योजनेअंतर्गत विवाहासाठी जोडपी मिळविण्यासाठी कोणत्या माध्यमाद्वारे प्रचार व प्रसार करण्यात येतो, याबाबत स्वयंसेवी संघटनांकडून घेण्यात आलेल्या माहितीबाबतचा विभागनिहाय तपशिल खालील तक्ता क्र.५.३ मध्ये दिला आहे.

## तक्ता क्र.- ५.३
## योजनेचा प्रचार व प्रसार

| अ.क्र | विभाग | प्रसिद्धीपत्रक | वर्तमानपत्र | टि.व्ही | रेडिओ | इतर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कोकण | २ | १ | ० | ० | ० | ३ |
| २ | नाशिक | ६ | ४ | ० | ० | २ | १२ |
| ३ | पुणे | ५ | २ | १ | १ | ४ | १३ |
| ४ | औरंगाबाद | ८ | ३ | ० | ० | ४ | १५ |
| ५ | अमरावती | ९ | २ | ० | ० | ० | ११ |
| ६ | नागपूर | ७ | १ | ० | ० | १ | ९ |
| | एकूण | ३७ | १३ | १ | १ | ११ | ६३ |

**५.७** शुभमंगल सामुहिक विवाह या योजनेचा प्रामुख्याने प्रसिद्धीपत्रकाद्वारे सर्वात जास्त म्हणजे ५९ टक्के संस्थांनी प्रचार केला असल्याचे तर त्याखालोखाल वर्तमानपत्राद्वारे २१ टक्के संस्थांनी प्रचार व प्रसार केल्याचे दिसून येते.

**५.८** या योजनेअंतर्गत सामुहिक विवाहासाठी नोंदणी करण्यासाठी शेतकरी/शेतमजूर यांचेकडून ४१ टक्के उत्कृष्ट, ५२ टक्के सकारात्मक तर ७ टक्के नकारात्मक प्रतिसाद मिळाल्याचे दिसून येते.

**५.९** शुभमंगल सामुहिक विवाह योजना राबविण्यात आल्या पासून समाजामध्ये सामाजिक बदल घडून येत आहेत का याबाबत स्वयंसेवी संस्थांकडून अभिप्राय घेतले असता ९० टक्के स्वयंसेवी संस्थांनी सामाजिक बदल घडत असल्याचे सांगितले.

**५.१०** शुभमंगल सामुहिक विवाह योजनेअंतर्गत सामुहिक विवाह संपन्न झाल्यानंतर शासकीय अधिकाऱ्यांकडून योग्यप्रकारे सहकार्य मिळत असल्याचे ८० टक्के स्वयंसेवी संस्थांनी सांगितले.

**५.११** शुभमंगल सामुहिक विवाह योजनेअंतर्गत संस्थांना शासनाकडून मिळणारे अनुदान वेळेवर मिळत नसल्याचे ७० टक्के संस्थांनी सांगितले.

**५.१३** शुभमंगल सामुहिक विवाह योजनेअंतर्गत संस्थांना प्रति जोडपे मिळणारे अनुदान ₹ २,०००/- हे पुरेसे नसल्याचे ८४ टक्के स्वयंसेवी संस्थांनी सांगितले.

**५.१४** शुभमंगल सामुहिक विवाह योजनेअंतर्गत सामुहिक विवाह केल्यामुळे हुंडापध्दतीला प्रतिबंध झाला असल्याचे ७७ टक्के स्वयंसेवी संस्थांनी सांगितले.

**५.१५** शासनाने शुभमंगल सामुहिक विवाह योजना लागू केल्याने शेतकऱ्यांच्या आत्महत्या करण्याचे प्रमाण कमी झाल्याचे ६८ टक्के स्वयंसेवी संस्थांनी सांगितले.

*******

# प्रकरण - ६
# योजनेशी संबंधित लाभधारकांविषयी माहिती

**६.१** "शुभमंगल सामुहिक विवाह योजना" या योजनेच्या मूल्यमापन अभ्यासाकरिता निवड झालेल्या एकूण ५४७ लाभधारकांकडून गोळा केलेल्या माहितीवर आधारित विश्लेषण खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

**६.२** "शुभमंगल सामुहिक विवाह योजना" या योजनेअंतर्गत लाभ दिलेल्या लाभधारकांपैकी १५ वर्षापेक्षा जास्त वर्षांपासून महाराष्ट्र राज्यातील अधिवास असलेले ९८ टक्के लाभधारक (वधूचे वडील / पालक) असल्याचे दिसून आले. उर्वरित २ टक्के लाभार्थ्यांचा महाराष्ट्र राज्यातील अधिवास १५ वर्षांपेक्षा कमी असतांनादेखील लाभ दिल्याचे दिसून आले.

**६.३** या योजनेअंतर्गत लाभ घेतलेल्या लाभधारकांची विभागनिहाय शैक्षणिक स्थिती तक्ता क्र. ६.१ मध्ये दिलीआहे.

### तक्ता ६.१
### लाभधारकांची शैक्षणिक स्थिती

| **विभाग** | **शैक्षणिक स्थिती** | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | **निरक्षर** | **१ ली ते ४थी** | **५ वी ते १० वी** | **१० वी पेक्षा जास्त** | **एकूण** |
| कोकण | १९ | ६ | ४ | - | २९ |
| नाशिक | ३६ | २२ | २४ | ५ | ८७ |
| पूणे | १९ | २२ | ३६ | १३ | ९० |
| औरंगाबाद | ३५ | ४० | ३६ | १० | १२१ |
| अमरावती | २४ | ४७ | २५ | ४ | १०० |
| नागपूर | २९ | ४८ | ३२ | ११ | १२० |
| **एकूण** | **१६२** | **१८५** | **१५७** | **४३** | **५४७** |

**६.४** "शुभमंगल सामुहिक विवाह योजना" या योजनेचा लाभ घेतलेल्या एकूण लाभार्थ्यांमध्ये २९ टक्के लाभार्थी निरक्षर होते, १ ली ते ४ थी पर्यन्त शिक्षण घेतलेले ३४ टक्के, ५ वी ते १० वी पर्यन्त शिक्षण घेतलेले २९ टक्के तर १० वी पेक्षा जास्त शिक्षण धारण केलेले ८ टक्के लाभधारक असल्याचे आढळून आले.

**६.५** या योजनेच्या मूल्यमापन अभ्यासासाठी निवड झालेल्या लाभधारकांची मूळ व्यवसायानुसार माहिती खालील तक्ता क्र.६.२ मध्ये दिली आहे.

## तक्ता ६.२
## लाभधारकांच्या मूळ व्यवसायानुसार विभागनिहाय माहिती

| **विभाग** | **कुटुंबाचा मूळ व्यवसाय** | | | |
|---|---|---|---|---|
| | **शेती** | **शेतमजूर** | **इतर** | **एकूण** |
| कोकण | ८ | १८ | ३ | २९ |
| नाशिक | ३७ | ३५ | १५ | ८७ |
| पूणे | ४९ | २५ | १६ | ९० |
| औरंगाबाद | ३७ | ६१ | २३ | १२१ |
| अमरावती | ३२ | ४९ | १९ | १०० |
| नागपूर | ४३ | ५९ | १८ | १२० |
| **एकूण** | **२०६** | **२४७** | **९४** | **५४७** |

**६.६** शुभमंगल सामुहिक विवाह योजनेअंतर्गत लाभ घेतलेल्या एकूण लाभार्थ्यांमध्ये ३८ टक्के कुटुंबे शेती करणारे, ४५ टक्के शेतमजूरी करणारे, आणि १७ टक्के लाभधारक इतर व्यवसाय करणारे होते.

**६.७** शुभमंगल सामुहिक विवाह योजनेअंतर्गत ज्या लाभधारकांनी लाभ घेतला, त्या लाभधारकांची सामाजिक प्रवर्गनिहाय माहिती तक्ता क्र. ६.३ मध्ये दिली आहे.

## तक्ता ६.३
## लाभधारकांच्या सामाजिक प्रवर्गानुसार विभागनिहाय माहिती

| **विभाग** | **सामाजिक प्रवर्ग** | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | **अ.जा.** | **अ.ज.** | **वि.ज.भ./वि.मा** | **इ.मा.व.** | **इतर** | **एकूण** |
| कोकण | ० | २० | ९ | ० | ० | २९ |
| नाशिक | २० | २३ | १ | १० | ३३ | ८७ |
| पूणे | १३ | ० | १९ | १९ | ३९ | ९० |
| औरंगाबाद | ६ | २२ | ३३ | २९ | ३१ | १२१ |
| अमरावती | ५० | २० | ४ | २१ | ५ | १०० |
| नागपूर | १३ | १६ | १८ | ५६ | १७ | १२१ |
| **एकूण** | **१०२** | **१०१** | **८४** | **१३५** | **१२५** | **५४७** |

**६.८** या योजनेअंतर्गत लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांमध्ये सर्वात जास्त लाभधारक(२४.६८ टक्के) हे इ.मा.व प्रवर्गातील असल्याचे आढळले, तर त्याखालोखाल अ.जा. १८.६५ टक्के, अ.ज. १८.४६ टक्के.इ. आढळून आले.

**६.९** शुभमंगल सामुहिक विवाह योजनेअंतर्गत ज्या लाभधारकांनी लाभ घेतला,त्या लाभधारकांचे वार्षिक उत्पन्नानुसार वर्गीकरण तक्ता क्र .६.४ मध्ये दिले आहे.

## तक्ता ६.४
## लाभार्थी कुटंबाचे वार्षिक उत्पन्नानुसार विभागनिहाय वर्गीकरण

| विभाग | कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न | | | |
|---|---|---|---|---|
| | ₹ २४,०००/- पेक्षा कमी | ₹ २४,०००/- ते ५०,०००/- | ₹ ५०,०००/- पेक्षा जास्त | एकूण |
| कोकण | २८ | १ | ० | २९ |
| नाशिक | ५६ | २३ | ८ | ८७ |
| पुणे | ४१ | ४३ | ६ | ९० |
| औरंगाबाद | ५६ | ५२ | १३ | १२१ |
| अमरावती | ७७ | २० | ३ | १०० |
| नागपूर | ८९ | २८ | ३ | १२० |
| **एकूण** | **३४७** | **१६७** | **३३** | **५४७** |

**६.१०** या योजनेअंतर्गत लाभ घेतलेल्या एकूण लाभार्थ्यांमध्ये ₹ २४,०००/- पेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण ६३ टक्के, ₹ २४,०००/- ते ५०,०००/- पर्यंत उत्पन्न असणाऱ्यांचे प्रमाण ३१ टक्के होते, तर ₹ ५०,०००/- पेक्षा जास्त उत्पन्न असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण ६ टक्के होते.

**६.११** शुभमंगल सामुहिक विवाह योजना या योजनेअंतर्गत एकूण लाभार्थ्यांपैकी ९५ टक्के लाभार्थ्यांनी त्यांच्या मुलीचे नाव स्वयंसेवी संस्थांकडे नोंदविलेले असल्याचे सांगितले, तर ५ टक्के लाभधारकांनी स्वयंसेवी संस्थांकडे नोंदणी केली नसल्याचे दिसून आले.

**६.१२** शुभमंगल सामुहिक विवाह या योजनेची माहिती लाभार्थ्यांना कोणत्या माध्यमाद्वारे प्राप्त झाली याबाबतचा विभागनिहाय तपशिल तक्ता क्र.६.५ मध्ये दिला आहे.

## तक्ता क्र.६.५
## लाभार्थ्यांना योजनेविषयी माहिती प्राप्त झालेल्या माध्यमांचा विभागनिहाय तपशिल

| विभाग | माध्यमांचा प्रकार | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | स्वयंसेवी संस्था | वर्तमानपत्र | टि.व्ही. | रेडिओ | जाहीरात | शासकीय अधिकाऱ्या-कडून | स्थानिक स्वराज्य संस्था | इतर | एकूण |
| कोकण | २९ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २९ |
| नाशिक | ५२ | ७ | ० | ० | १३ | ० | ० | १५ | ८७ |
| पुणे | ४० | १३ | १ | ० | २६ | ० | १ | ९ | ९० |
| औरंगाबाद | ७६ | १५ | ० | ३ | ९ | १ | ० | १७ | १२१ |
| अमरावती | ७४ | १० | ० | ० | १५ | ० | ० | १ | १०० |
| नागपूर | ८७ | १ | ० | ० | ९ | २ | ० | २१ | १२० |
| **एकूण** | **३५८** | **४६** | **१** | **३** | **७२** | **३** | **१** | **६३** | **५४७** |

**६.१३** "शुभमंगल सामुहिक विवाह योजना" या योजनेची माहिती लाभार्थ्यांना प्रामुख्याने स्वयंसेवी संस्थाद्वारे ६५ टक्के, त्याखालोखाल जाहिरातीद्वारे १३ टक्के, वर्तमानपत्राद्वारे ८ टक्के इ. माध्यमांद्वारे मिळाल्याचे दिसून आले.

**६.१४** "शुभमंगल सामुहिक विवाह योजना" या योजनेअंतर्गत ज्या लाभधारकांनी आपल्या मुलीचा विवाह सामुहिक विवाह सोहळयामध्ये केलेला आहे, त्यामागील कारणांचा तपशिल तक्ता क्र. ६.६ मध्ये दिला आहे.

## तक्ता ६.६
## सामुहिक विवाह सोहळयामध्ये विवाह करण्यामागील कारणांचा तपशिल

| **विभाग** | **सामुहिक विवाह सोहळयामध्ये विवाह करण्यामागील कारणे** | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | **स्वयंनिर्णय** | **योजनेच्या लाभासाठी** | **आर्थिक परिस्थिती** | **सामाजिक सुधारणेसाठी** | **पैशाची बचत करण्यासाठी** | **इतर** | **एकूण** |
| कोकण | १ | ९ | १९ | ० | ० | ० | २९ |
| नाशिक | १९ | २५ | ३१ | १० | २ | ० | ८७ |
| पूणे | १५ | ११ | ५२ | ५ | ७ | ० | ९० |
| औरंगाबाद | १३ | ० | ६७ | ११ | ३० | ० | १२१ |
| अमरावती | २३ | १८ | ५४ | ३ | २ | ० | १०० |
| नागपूर | ८ | १ | ७१ | १३ | २५ | २ | १२० |
| **एकूण** | **७९** | **६४** | **२९४** | **४२** | **६६** | **२** | **५४७** |

**६.१५** "शुभमंगल सामुहिक विवाह योजना" या योजनेचा लाभ घेतलेल्या एकूण लाभार्थ्यापैकी ५४ टक्के लाभार्थ्यांनी त्यांच्या आर्थिक परिस्थितीमुळे सामुहिक विवाह सोहळयामध्ये विवाह केल्याचे कारण सांगितले, तर त्याखालोखाल स्वयंनिर्णय घेऊन विवाह केल्याचे १४ टक्के, योजनेचा लाभ घेण्यासाठी १२ टक्के, सामाजिक सुधारणा घडविण्याच्या हेतूने ८ टक्के, पैशाची बचत व्हावी यासाठी १२ टक्के इ.कारणास्तव सामुहिक विवाह सोहळयामध्ये विवाह केल्याचे सांगितले.

**६.१६** ज्या लाभधारकांनी शुभमंगल सामुहिक विवाह योजनेचा लाभ घेतला आहे अशा लाभधारकांच्या मुलींचा सध्याच्या वैवाहिक दर्जाबाबत माहिती घेतली असता प्रथमत:च विवाह करणाऱ्या ९९ टक्के तर, दुसऱ्यांदा विवाह करणाऱ्या मुलींची टक्केवारी १ टक्का असल्याचे दिसून आले.

**६.१७** "शुभमंगल सामुहिक विवाह योजना" या योजनेअंतर्गत सामुहिक विवाह ज्या पातळीवर संपन्न झाला त्या ठिकाणाची विभागनिहाय माहिती खालील तक्ता क्र.६.७ मध्ये देण्यात आली आहे.

## तक्ता ६.७
## सामुहिक विवाह संपन्न झालेल्या ठिकाणाची पातळी

| विभाग | खेडेगांव | तालुका | जिल्हा | एकूण |
|---|---|---|---|---|
| कोकण | २९ | - | - | २९ |
| नाशिक | ४० | ३१ | १६ | ८७ |
| पूणे | ६० | २० | १० | ९० |
| औरंगाबाद | ८१ | १० | ३० | १२१ |
| अमरावती | ६२ | २१ | १७ | १०० |
| नागपूर | ५४ | ५२ | १४ | १२० |
| **एकूण** | **३२६** | **१३४** | **८७** | **५४७** |

**६.१८** या योजनेअंतर्गत करण्यात येणारे विवाह हे शक्यतो तालुका पातळीवर करण्याचे निर्देश असतांनादेखील प्रामुख्याने गाव पातळीवर ६० टक्के विवाह संपन्न झाल्याचे तर, त्याखालोखाल तालुक्यास्तरावर २५ टक्के आणि जिल्हास्तरावर १५ टक्के सामुहिक विवाह संपन्न झाल्याचे दिसून आले.

**६.१९** "शुभमंगल सामुहिक विवाह योजना" या योजनेअंतर्गत ज्या लाभधारकांनी सामुहिक विवाह सोहळ्यात सहभाग घेतला, अशा लाभधारकांना मुलीच्या विवाहाच्यावेळी मिळालेले अनुदान व वस्तू यांची एकत्रित परिगणना केली असता ₹ १० हजारापर्यन्त किंमत परिगणित झाल्याचे ९८ टक्के लाभधारकांनी सांगितले, तर ₹ १० हजारापेक्षा कमी किंमत परिगणित झाल्याचे १ टक्का लाभधारक होते, तर काहीही न मिळालेले १ टक्का लाभधारक असल्याचे दिसून आले.

**६.२०** "शुभमंगल सामुहिक विवाह योजना" या योजनेअंतर्गत ज्या लाभधारकांनी मुलीच्या विवाह सोहळ्यामध्ये सहभाग घेतला आहे त्यांना मिळणारे आर्थिक सहाय्य विवाहानंतर किती कालावधीने मिळाले याबाबतचा तपशिल खालील तक्ता क्र. ६.८ मध्ये दिला आहे.

## तक्ता क्र. ६.८
## आर्थिक सहाय्य मिळाल्याच्या कालावधीनुसार विभागनिहाय तपशिल

| विभाग | आर्थिक सहाय मिळाल्याचा कालावधी | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | एक महिना | दोन महिने | तीन महिने | सहा महिने | सहा महिन्यापेक्षा जास्त | मिळाले नाही | एकूण |
| कोकण | २० | ० | ० | ० | ९ | ० | २९ |
| नाशिक | ० | ९ | २४ | २१ | ३३ | ० | ८७ |
| पूणे | ० | ० | ५ | ३७ | ४८ | ० | ९० |
| औरंगाबाद | १९ | ० | ० | २४ | ७८ | ० | १२१ |
| अमरावती | २ | ९ | ५ | ३० | ५२ | २ | १०० |
| नागपूर | १२ | ३३ | १८ | ९ | ४५ | ३ | १२० |
| **एकूण** | **५३** | **५१** | **५२** | **१२१** | **२६५** | **५** | **५४७** |

**६.२१** "शुभमंगल सामुहिक विवाह योजना" या योजनेचा लाभ घेतलेल्या एकूण लाभार्थ्यांपैकी १० टक्के लाभार्थ्यांना विवाहानंतर एका महिन्यात, ९ टक्के लाभार्थ्यांना विवाहानंतर दोन महिन्यात, १० टक्के लाभार्थ्यांना विवाहानंतर तीन महिन्यात, २२ टक्के लाभार्थ्यांना विवाहानंतर सहा महिन्यात, ४८ टक्के लाभार्थ्यांना विवाहानंतर सहा महिन्यापेक्षा जास्त कालावधीने आर्थिक सहाय्याचा लाभ मिळाले असल्याचे तर आर्थिक सहाय्यच न मिळालेले १ टक्का लाभार्थी असल्याचे दिसून आले.

**६.२२** या योजनेअंतर्गत ज्या लाभधारकांनी सामुहिक विवाहसोहळयात मुलीच्या विवाहासाठी सहभाग घेतला अशा लाभधारकांपैकी ९८ टक्के लाभार्थ्यांना धनादेशाच्या स्वरुपात अर्थसहाय्य मिळाल्याचे दिसून आले.

**६.२३** या योजनेचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांनी आर्थिक सहाय्याचा वापर कसा केला याची माहीती घेतली असता, एकूण लाभधारकांपैकी दागिन्यांसाठी ११ टक्के लाभार्थ्यांनी, ३४ टक्के लाभधारकांनी भांड्यांसाठी तर ५५ टक्के लाभधारकांनी इतर खर्चासाठी आर्थिक सहाय्याचा वापर केल्याचे सांगितले.

**६.२४** या योजनेचा लाभ घेतलेल्या एकूण लाभार्थ्यांपैकी ७२ टक्के लाभार्थ्यांच्या मुलींना विवाह नोंदणी प्रमाणपत्र मिळाले असल्याचे दिसून आले.

**६.२५** शुभमंगल सामुहिक विवाह योजनेअंतर्गत सामुहिक विवाह मेळाव्यांमध्ये मुलीच्या विवाह निमित्ताने लाभार्थ्यांनी शासनाकडून मिळालेल्या अनुदानाव्यतिरिक्त केलेल्या खर्चाचा तपशिल तक्ता क्र.६.९ मध्ये दिला आहे.

**तक्ता ६.९**
**विवाहानिमित्ताने लाभधारकांनी अनुदानाव्यतिरिक्त केलेल्या खर्चानुसार लाभधारकांची वर्गवारी**

| विभाग | लाभधारकाने विवाहानिमित्तानेने केलेल्या खर्चानुसार लाभधारकांची वर्गवारी | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | ₹ २५००० पेक्षा कमी | ₹ २५००० ते ५०००० | ₹ ५०००० ते १००००० | ₹ १००००० पेक्षा जास्त | एकूण |
| कोकण | २८ | १ | ० | ० | २९ |
| नाशिक | ५२ | ३१ | ४ | ० | ८७ |
| पूणे | ६६ | १९ | ३ | २ | ९० |
| औरंगाबाद | ६८ | ३४ | १५ | ४ | १२१ |
| अमरावती | ७७ | १८ | ४ | १ | १०० |
| नागपूर | ७५ | ३२ | ९ | ४ | १२० |
| **एकूण** | **३६६** | **१३५** | **३५** | **११** | **५४७** |

**६.२६** "शुभमंगल सामुहिक विवाह योजना" या योजनेअंतर्गत लाभधारकांनी शासनाकडून प्राप्त होणाऱ्या अनुदानाव्यतिरिक्त कपडे, दागिने, आहेर, जेवण, पूजा, वाहन, इ. करिता अतिरिक्त खर्च केला असल्याचे दिसून आले. एकूण ५४७ लाभधारकांपैकी ६७ टक्के लाभधारकांनी ₹ २५,०००/- पर्यंत किंवा त्यापेक्षा कमी खर्च केलेला होता, २५ टक्के लाभधारकांनी ₹ २५,००० ते ५०,०००/- पर्यंत खर्च केला होता, ६ टक्के लाभधारकांनी ₹ ५०,०००/- ते ₹ १ लाखापर्यंत खर्च केला होता, ₹ १ लाख किंवा त्यापेक्षा जास्त खर्च करणाऱ्या लाभधारकांची टक्केवारी २ टक्के इतकी होती.

**६.२७** "शुभमंगल सामुहिक विवाह योजना" या योजनेअंतर्गत प्राप्त अनुदानापेक्षा जास्तीच्या खर्चाच्या स्त्रोतानुसार विभागनिहाय माहिती खालील तक्ता क्र. ६.१० मध्ये दिली आहे.

## तक्ता ६.१०
## विवाहासाठी अनुदानापेक्षा जास्तीच्या खर्चाच्या स्त्रोत

| **विभाग** | **विवाहासाठी जास्तीच्या खर्चाचा स्त्रोत** | | | |
|---|---|---|---|---|
| | **स्वत:च्या उत्पन्नातून** | **नातेवाईकांकडून** | **सावकारांकडून** | **एकूण** |
| कोकण | १९ | ८ | २ | २९ |
| नाशिक | ६३ | २३ | १ | ८७ |
| पूणे | ४२ | २५ | २३ | ९० |
| औरंगाबाद | ७५ | ३२ | १४ | १२१ |
| अमरावती | ७७ | १८ | ५ | १०० |
| नागपूर | ८५ | २३ | १२ | १२१ |
| **एकूण** | **३६१** | **१२९** | **५७** | **५४७** |

**६.२८** प्राप्त माहितीवरुन असे निदर्शनास येते की, ६६ टक्के लाभधारकांनी स्वत:च्या उत्पन्नातून, २४ टक्के लाभधारकांनी नातेवाईकांकडून मदत घेऊन व १० टक्के लाभधारकांनी सावकारांकडून कर्ज घेऊन मुलीच्या विवाहासाठीचा अतिरिक्त खर्च भागविल्याचे दिसून आले.

**६.२९** "शुभमंगल सामुहिक विवाह योजना" योजनेच्या मूल्यमापन पाहणीसाठी निवड झालेल्या लाभार्थ्यांपैकी ८४ टक्के लाभार्थ्यांनी शेतकरी असल्याचा पुरावा म्हणून जमिनीच्या ७/१२ चा उतारा व गावाचा रहिवासी असल्याचा दाखला सादर केल्याचे दिसून आले, तर १६ टक्के लाभार्थ्यानी आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता केली नसतांनादेखील त्यांना योजनेचा लाभ देण्यात आल्याचे दिसून आले.

**६.३०** "शुभमंगल सामुहिक विवाह योजना" या योजनेच्या मूल्यमापन पाहणीसाठी निवड झालेल्या लाभार्थ्यांपैकी १६ टक्के लाभार्थ्यांनी मुलीच्या विवाहासाठी हुंडा द्यावा लागला असे सांगितले. या १६ टक्के लाभार्थ्यांपैकी ₹ १० ते २० हजार पर्यंत हुंडा देणाऱ्यांची टक्केवारी ३७ टक्के, ₹ २० ते ५० हजार पर्यंत हुंडा देणाऱ्यांची टक्केवारी ३० टक्के, ₹ ५० हजार व त्यापेक्षा अधिक हुंडा देणाऱ्यांची टक्केवारी ११ टक्के तर ₹ १० हजारपेक्षा कमी हुंडा देणाऱ्यांची टक्केवारी २२ टक्के इतकी होती.

**६.३१** या योजनेंतर्गत ५४७ लाभार्थ्यांपैकी ८३ टक्के लाभार्थ्यांनी योजना "अत्यंत उपयुक्त" आहे असे सांगितले, तर योजना "साधारण उपयुक्त" आहे असे सांगणाऱ्यांची टक्केवारी १७ टक्के इतकी होती.

*******